नगरसचिव

पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता

पुणे महानगरपालिका – सूचना – कार्यपत्रिका क्र.७

ऑगस्ट २०२६

पुणे महानगरपालिकेची मासिक सर्वसाधारण सभा **मंगळवार,दि.१८/८/२०२६** रोजी **दुपारी ०३.००** **(तीन)** वाजता **हिंदवी स्वराज्याचे संस्थापक श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात (पुणे महानगरपालिकेच्या नविन विस्तारीत इमारतीतील सभागृहात)** भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

वृत्तांत कायम करणे.

प्रश्नोत्तरे

मुंबई प्रांतिक म न पा अधिनियम, १९४९ चे कलम ४४ अन्वये प्रश्नोत्तरे.

स्थायी समितीचे ठराव

विषय क्र.१३७

संदर्भ :- १) महाराष्ट्र शासन,अधिसूचना क्रमांक टीपीएस/१८२०/अनौस-१७/प्र.क्र.११३/२०२०/ कलम ३७ (१कक)(ग) नवि-१३,दि.७/२/२०२४

२) मा.महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचेकडील आदेश जा.क्र.मआ/१८१२, दिनांक२४/४/२०२५

३) नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.२०२४/प्र.क्र.३९/नवि-२२,दि.२८/१/२०२५

४) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/Tax/५५४,दि.३/९/२०२५ चे पत्र.

५) मा.स्थायी समिती ठराव क्र.५४८,दि.४/९/२०२५

६) मनपा ठराव क्र.१९२,दि.१९/९/२०२५

७) मनपा ठराव क्र.२१९,दि.१६/१०/२०२५

८) मनपा ठराव क्र.२५५,दि.२०/११/२०२५

९) मनपा ठराव क्र.३१९,दि.१२/१२/२०२५

१०) मनपा ठरावक्र.४१२,दि.१९/१/२०२६

११) मनपा ठराव क्र.५६९,दि.२३/३/२०२६

१२) मा.पृथ्वीराज सुतार व मा.सचिन दोडके यांची दि.२४/४/२०२६ ची उपसूचना.

१३) मनपा ठराव क्र.१०,दि.२४/४/२०२६

१४) मा.पृथ्वीराज सुतार व मा.बाळा ओसवाल यांची दि.३०/६/२०२६ ची उपसूचना.

१५) मनपा ठराव क्र.३७,दि.३०/६/२०२६

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून व मा.प्रशासक यांचे आदेशानुसार –

महात्मा फुले स्मारक व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मारक एकत्रीकरण व विस्तारीकरणाबाबतचा प्राथमिक अहवाल व पुनर्वसन धोरणासाठी खालील बाबींस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस

करण्यात येत आहे.

१) भूसंपादन कायदा २०१३ अन्वये भूसंपादनाची कार्यवाही अंतिम टप्प्यात असून जे मिळकतधारक दि.१०/९/२०२५ पुर्ण होण्यापूर्वी तडजोडीने त्यांचे मालकीचे मिळकतीचा ताबा पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात देतील त्यांना सन २०२५-२६ च्या रेडी रेकनरच्या दरानुसार येणाऱ्या मुल्यांकनाची दुप्पट रक्कम रोख मोबदल्याच्या स्वरूपात देणे, सदर कामी मिळकतधारकांना आयकर लागू झाल्यास संबंधितांनी भरलेल्या आयकर रकमेचा परतावा संबंधित मिळकतधारकांना पुणे महानगरपालिकेमार्फत स्वतंत्ररित्या करणेस.

२) ज्या मिळकतधारकांना पुणे महानगरपालिकेच्या ताब्यातील सदनिका मालकी हक्काने घ्यावयाच्या आहेत अशा मिळकतधारकांना त्यांचे मिळकतीचे रेडी रेकनरच्या दरानुसार निर्धारित केलेल्या नुकसान भरपाई रकमे इतक्या किंमतीच्या पुणे महानगरपालिकेच्या ताब्यातील सदनिका मालकी हक्काने देणेस.

३) प्रकल्प बाधित भाडेकरू/वहिवाटदार यांना पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या सदनिका रेडीरेकनर नुसार येणाऱ्या मुल्यांकन रक्कमेच्या ०.५% वार्षिक दरानुसार येणारे भाडे आकारून भाडे पट्ट्याने देणेस. सदरचे भाडे मिळकतीच्या लोकेशननुसार सर्वसाधारणपणे र.रू.७००/- ते र.रू.१४००/- इतके असेल. संबंधित पात्र लाभार्थी इच्छुक असल्यास व त्यांनी स्वहिश्शाची रक्कम भरल्यास प्रधानमंत्री आवास योजनेतंर्गत (पीएमएवाय) अग्रक्रमाने कायमस्वरूपी पुनर्वसन करणेस.

४) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचेकडून प्रकल्पाचे आसपासचे भागात सदनिका उपलब्ध झाल्यास सदर सदनिका मिळकतधारक /भाडेकरू यांचे पुनर्वसनासाठी वापरणेस.

५) मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रातील निवेदनात नमूद मिळकर्तीचे मुल्यांकन जागेवरील प्राथमिक सर्वेक्षण अहवालानुसार केले असून ते अंदाजित आहेत. त्यामुळे प्रत्यक्ष मोबदला आदा करतेवेळी या रकमेत फरक पडण्याची (कमी-जास्त होण्याची) शक्यता असून मोबदल्याची अंतिम रक्कम निश्चित करण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना देणेस.

(टीप-सदर विषयाचा विचार माहे ऑगस्ट २०२६ च्या कार्यपत्रिकेवर घ्यावा असा मनपा ठराव क्र.१२०,दि.२९/७/२०२६ चा झाला आहे.)

<u>विषय क्र.१३८</u>

संदर्भ - १) मा.विशाल धनवडे व मा.डॉ.दादा कोद्रे यांचे दि.१४/५/२०२६ चे फेरविचाराचे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१७८,दि.१४/५/२०२६

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

मा.स्थायी समिती ठराव क्र.११५,दि.३०/४/२०२६ चा फेर विचार करण्यात आला.

पुणे पेठ बुधवार येथील महात्मा फुले मंडई परिसरातील आर्यन वाहनतळ मक्ता पध्दतीने व्यवस्थापन व संचलन करणे या वाहनतळाच्या कार्यादेश दिनांकापासून ३ वर्षाच्या कालावधीकरिता चालविणे करिता निविदा मागविल्या असता आलेल्या ५ निविदांपैकी सर्वाधिक दर देणारे निविदादार मे.इंडिया एन्टरप्रायझेस यांनी देऊ केलेली वार्षिक रक्कम रूपये ६२,०७,७८३=७७८ ही मनपा निर्धारित रक्कम रू.४२,४३,८५५/- पेक्षा र.रू.१९,६३,९२८=७७८ पेक्षा (४६.२२७% ने जास्त)असल्याने त्यांची निविदा स्वीकारून कार्यादेश दिनांकापासून ३ वर्ष कालावधीसाठी टेंडर अटी व शर्ती प्रमाणे प्रती वर्षी २% आयकर घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

(मा.स्थायी समिती ठराव क्र.११५,दि.३०/४/२०२६ चा निरस्त करण्यात येत आहे.)

<u>विषय क्र.१३९</u>

संदर्भ – १) मा.स्थायी समिती ठराव क्र.३००,दि.१६/६/२०२६

२) मिळकतधारक सौ.रेणू संभाजी दिवेकर व इतर यांचे पत्र इकडील आ.क्र.२९७८,दि.२/७/२०२६

३) दि.३/७/२०२६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त जा.क्र.२१७४,दि.६/७/२०२६

४) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्य/२७४,दि.८/७/२०२६ चे पत्र.

५) मा.विशाल धनवडे व मा.प्रशांत जगताप यांची दि.२३/७/२०२६ ची उपसूचना.

६) मा.स्थायी समिती ठराव क्र.५२३,दि.२३/७/२०२६

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून व संदर्भ क्र.४ च्या उपसूचनेनुसार –

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील कलम ७७ अन्वये पालखी सोहळ्याच्या विठोबा मंदिर परिसरातील भवानी पेठ, सि.स.नं.१२२६ व १२२७ येथील खासगी मिळकती तडजोडीने ताब्यात घेण्यास, संबंधित मिळकतधारकांना नियमानुसार अनुज्ञेय मोबदला आदा करण्यास तसेच त्यानुषंगाने आवश्यक कार्यवाही करणेबाबतच्या खालील बाबींस मान्यता देण्यात यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

१) मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रात नमूद केलेल्या प्रचलित कायदेशीर तरतुदीनुसार सि.स.नं.१२२६ आणि १२२७ या संपूर्ण मिळकतीचे सोलॅशिअमसह देय होणारा मोबदला र.रू.१,०१,२१,३१२/- इतका परिगणित केला असून, मजलानिहाय मोबदला रक्कम विगतवारी तक्ता **अ** व **ब** मध्ये नमूद करण्यात आलेला असून त्यानुसार आदा करणेस.

२) मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रात नमूद केलेल्या प्रचलित कायदेशीर तरतुदीनुसार देय होणारा मोबदला व मिळकतधारक यांनी अपेक्षीलेला मोबदला यात जास्त फरक दिसून येत असल्याने संबंधित मिळकत धारकांना देय मोबदला रक्कम निश्चित करताना भूसंपादन अधिनियम २०१३ मधील कलम २६ नुसार नोंदणीकृत खरेदी खतांच्या आधारे (Registered Value) सदर भागामध्ये मागील तीन वर्षामध्ये सारख्याच पध्दतीने झालेले खरेदी विक्री व्यवहाराच्या नोंदी विचारात घेऊन त्यापैंकी सर्वात जास्त किंमत असणाऱ्या खरेदी विक्री व्यवहार नोंदी विचारात घेऊन त्यांची सरासरी काढून येणारी रक्कम विचारात घेणे आवश्यक आहे. तसेच शीघ्रसिध्दगणक दर व नोंदणीकृत खरेदी खतांच्या आधारे येणारी सरासरी रक्कम यापैकी जी रक्कम असेल त्याच्या आसपास देय मोबदला निश्चित करणे संयुक्तिक राहील. मनपा अधिनियमांमधील कलम ७७ अन्वये मा.स्थायी समिती स्तरावर एक वेळची अपवादात्मक बाब म्हणून जाणीवपूर्वक निर्णय घेऊन वित्तीय नियमांचे पालन करणेच्या अधीन राहून सदर मिळकतींचे संपादन करणेकामी मिळकतधारकांना वाजवी देय मोबदला निश्चित करून मिळणेस.

३) भवानी पेठ सि.स.नं.१२२६ आणि १२२७ या मिळकतीचा दि.३/७/२०२६ रोजी प्राथमिक ताबेयादीद्वारे ताबा घेण्यात आला असून, मा.स्थायी समितीमध्ये निर्णयाअंती निश्चित करण्यात येणारा मोबदला संबंधितांना प्रचलित कार्यपध्दतीनुसार आदा करून मिळकतींचा ताबा घेणे व अनुषंगिक पुढील कार्यवाही करण्यास मान्यता मिळणेस.

४) तसेच मिळकतधारकांना मोबदला आदा करणेपूर्वी विधी विभागाकडून मिळकतीचे मालकी हक्काबाबत शहानिशा करून पुणे महानगरपालिकेच्या लाभात हस्तांतरण दस्त नोंदवून घेणेस.

५) सदर प्रकरणी स्थायी समितीमार्फत निश्चित होणारा देय मोबदला संबंधित मिळकतधारकांना भवन रचना विभागाच्या CE22A548/SJ10-3796 या बजेट हेड मधून अदा करणेकामी मान्यता मिळणेस.

६) ताब्यात आलेल्या मिळकतीचे विकसन करणेकामी सदर जागा भवन रचना विभागास हस्तांतरीत करणेस.

संदर्भ क्र.५ च्या उपसूचनेनुसार –

७) सदर मिळकत पालखीसाठी दिल्याप्रकरणी जागा मालक व भाडेकरू यांचे धन्यवाद. सदर मिळकतीचा पूर्णपणे ताबा हा भाडेकरू यांच्याकडे होता. सदर मालक व भाडेकरू यांनी पालखी सोहळ्याच्या अनुषंगाने १२२६ व

१२२७ ही मिळकत तडजोडीने ताब्यात दिली असून सदर जागेवर राऊत कुटुंबियाचे चालू केशकर्तनालयाचे दुकान मागील ३ पिढ्यांपासून आहे. अचानक एका रात्रीत दुकान पडल्याने त्यांच्या उपजिविकेचा प्रश्न निर्माण झाला असल्याने १) प्रदिप शिवाजी राऊत २) अनिल मनोहर राऊत ३) महेश गणेश राऊत ह्या राऊत बंधूना प्रत्येकी र.रू.१० लाख असे र.रू.३० लाख देण्यात यावे.

<u>विषय क्र.१४०</u>

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचा ठराव क्र.६/६५६,दि.८/१२/२०२५ चे पत्र.
२) दि.५/१२/२०२५ रोजीची जाहिरात
३) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/समाजविकास /१७०,दि.१०/६/२०२६ चे पत्र.
४) मा.स्थायी समिती ठराव क्र.४६७,दि.१६/७/२०२६
५) मा.संदिप बेलदरे व मा.सुहास टिंगरे यांचे दि.२३/७/२०२६ चे फेरविचाराचे पत्र.
६) मा.स्थायी समिती ठराव क्र.५३५,दि.२३/७/२०२६

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

(मा.स्थायी समिती ठराव क्र.४६७,दि.१६/७/२०२६ चा फेरविचार करण्यात आला.)

पुणे महानगरपालिकेच्या मिळकतीमध्ये अशासकीय/सामाजिक/स्वयंसेवी संस्था व पुणे मनपा (समाज विकास विभाग) यांच्या संयुक्त सहकार्याने डॉ.दळवी हॉस्पीटल नरवीर तानाजीवाडी, शिवाजीनगर, पुणे.५ या ठिकाणी विशेष दिव्यांगांसाठी थेरपी उपक्रम राबविणेकरिता निवेदनाचे अवलोकन होवून संस्था निवड करणेकामी खालील बाबींस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

१) लायन्स क्लब ऑफ पुना आय फाऊंडेशन, कै.मुकुंदराव लेले मेमोरियल हॉस्पीटल, शनिवार पेठ, शनिवारवाड्याजवळ, पुणे ३० या संस्थेची डॉ.दळवी हॉस्पीटल नरवीर तानाजीवाडी,शिवाजीनगर, पुणे.५ या ठिकाणांच्या दिव्यांग उपचार केंद्रात दिव्यांगांसाठी वेगवेगळ्या थेरपी,उपचार, समुपदेशन हा उपक्रम राबविणेकरीता निवड करणेस.

२) थेरपीसाठी रूग्णांकडून संस्थेमार्फत आकारणेत येणाऱ्या खालील शुल्क रक्कमेस मान्यता देणेस.

(दर GST Included)

No.	CONSULTATION THERAPY	PROPOSED/REVISED PUNE CENTER CHARGES
1	PEDIATRIC NEUROLOGICAL CONSULTATION	Rs.200/-
2	PSYCHOLOGICAL EVALUATIONS	Rs.300/-
3	SPEECH THERAPY	Rs.300/-
4	OCCUPATIONAL THERAPY	Rs.350/-
5	PHYSIOTHERAPY	Rs.200/-
6	BEHAVIOUR MODIFICATION THERAPY	Rs.300/-
7	GENETIC CONSULTATIONS	Rs.350/-
8	QAE (AUDIOLOGAL TEST)	Rs.250/-
9	PTA TEST	Rs.250/-
10	SPCIAL EDUCATION	Rs.300/-
11	REMEDIAL THERAPY	Rs.500/-
12	BERA TEST	Rs.1200/-
13	EEG TEST	Rs.1000/-

३) पुणे महानगरपालिकेचे शाळांतील विद्यार्थी व मनपा रूग्णालय यांनी रेफर केलेले रूग्ण यांना प्रस्तावित दरापेक्षा निम्म्या दराने (५०%) शुल्क आकारणी करणेस व सदरची रक्कम पुणे मनपा समाज विकास

विभागाकडील ४ड, दिव्यांग कल्याणकारी योजना (FE14E101) व (FE14E134)या अर्थशिर्षकामधून आदा करणेस.

४) निवड झालेल्या संस्थेसमवेत सर्वप्रथम ५ वर्षासाठी करारनामा करणेस.

५) संस्थेमार्फत राबविणेत येणाऱ्या उपक्रमाबाबत वेळोवेळी माहिती घेवून जर उपक्रम योग्य प्रकारे राबविला जात नसल्यास संस्थे समवेत करणेत आलेला करारनामा रद्द करणेस.

६) या व्यतिरिक्त कोणत्याही उपचार पध्दती (थेरपी) द्यावयाची झाल्यास थेरपी व त्यांचे दर निश्चितीकरण करणेसाठी मा.महापालिका आयुक्त यांना अधिकार देणेस.

(मा.स्थायी समिती ठराव क्र.४६७,दि.१६/७/२०२६ निरस्त करण्यात येत आहे.)

<u>विषय क्र.१४१</u>

संदर्भ – १) मा.नंदिनी धेंडे यांचे दि.१०/३/२०२६ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१४०,दि.२०/३/२०२६

३) मा.महा.आयुक्त यांचा जा.क्र.मआ/शहर अभियंता/३६,दि.२२/४/२०२६चा अभिप्राय विचारासाठी

४) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.८८,दि.३/७/२०२६

५) मा.प्रशांत जगताप, मा.विशाल धनवडे, मा.संदिप बेलदरे, मा.डॉ.दादा कोद्रे, मा.निशा मानवतकर, मा.वृषाली कामठे, मा.रूपाली धाडवे, मा.प्राची आल्हाट, मा.कालिंदा पुंडे, मा.वैशाली बनकर, मा.मयुरी कोकाटे, मा.सुहास टिंगरे व मा.रत्नमाला सातव यांची दि.३०/७/२०२६ ची उपसूचना.

६) मा.स्थायी समिती ठराव क्र.५७४,दि.३०/७/२०२६

मा.शहर सुधारणा समितीची शिफारस विचारात घेऊन तसेच मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे महानगरपालिका शहर सुधारणा समिती ठराव क्र.१४०,दि.२०/३/२०२६ अन्वये पुणे महानगरपालिका हद्दीमधील मंगळवार पेठ येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक असून, त्या शेजारील महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या मालकीचे मंगळवार पेठ न.भु.क्र.४०५ मधील ८९०० चौ.मी.क्षेत्र या जागेच्या विस्तारी करणाबाबत खात्याकडील अभिप्राय पुढीलप्रमाणे सादर करण्यात आला आहे.महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २६,दि.५/१/२०२५ अन्वये मान्य विकास आराखडयानुसार CC-15 हे रिझर्व्हेशन प्रस्तावित करण्यात आले होते.त्यानंतर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१(१) अन्वये Modification Number us/90-m 6.2 नुसार प्रस्तावित रिझर्वेशन CC-15 Reservation deleted and Included in PSP Zone असे समाविष्ट केले आहे. मंगळवार पेठ न.भू.क्र.४०५ ही मिळकत डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनच्या लगत आहे. त्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनच्या विस्तारीकरणासाठी पुणे महानगरपालिकेने सदर आरक्षण प्रस्तावित केले होते. आंबेडकर भवनाच्या परिसरात अनेक विद्यार्थी MPSC/UPSC ची तयारी करण्यासाठी प्रशिक्षण घेण्यासाठी व अभ्यास करण्यासाठी येत असतात. त्यामुळे त्यांच्यासाठी व परिसरातील नागरिकांच्या सेवा सुविधेसाठी आरक्षित क्षेत्राच्या १५% बांधीव बांधकाम क्षेत्र महानगरपालिकेला विकसित करून हस्तांतरीत करणे आवश्यक आहे. याबाबत शासन स्तरावर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ च्या अनुषंगाने कार्यवाही बाबत शासनाकडे मागणी करण्यात आली होती.जा.क्र.टी.पी.एस.१८२४/८५६/२०२४/नवी–१३,दि.१२/६/२०२४ अन्वये मा.सह सचिव, महाराष्ट्र शासन यांनी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाशी सविस्तर चर्चा करून फेरबदलांच्या अनुषंगाने सविस्तर फेर अहवाल सादर करणेस पत्रान्वये कळविले

होते.त्यानुसार अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य र.वि.महा.पुणे यांच्या समवेत मा.महापालिका आयुक्त यांच्या दालनात बैठक संपन्न झाली सदर बैठकीत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे निविदा प्रक्रिया पूर्ण करून सदर जागा ९९ वर्षे कराराने वाणिज्य वापराकरिता भाडे पट्ट्याने हस्तांतरित केली असल्याचे नमूद केले व त्यामुळे पुणे महानगरपालिकेचे पत्र क्र.४१६९,दि.६/६/२०२४ च्या पत्रानुसार नमूद १५% भूखंड किंवा पूर्ण बांधकामाच्या १५% बांधीव बांधकाम क्षेत्र सोडणे महामंडळाच्या शक्य नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे याबाबत मे.शासनाने निर्णय घेणे योग्य होईल असे निर्देश दिले.तद्नंतर अप्पर सचिव ,महाराष्ट्र शासन,जा.क्र.टिपीएस-१८२४/२६/२०२४/नवी-१३,दि.५/८/२०२४ अन्वये पुणे येथील महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या मालकीचे न.भू.क्र.४०५ मधील क्षेत्र ८९०० चौ.मी.या जमिनीवरील सार्वजनिक निम-सार्वजनिक वापर बंद होणार असल्याने, सदर जागेबाबत मंजूर नियमावली-२०२० मधील विनियम क्र.४.१(V) नुसार कार्यवाही करणेस हरकत नाही,असे आदेश दिलेले आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित जा.क्र.मरारविम/०२/वाणिज्य विभाग /मंगळवार पेठ/२०२५/५९७१ अन्वये महामंडळाने मंगळवार पेठ, पुणे येथील नगर भूमापन क्र.४०५ मधील ८९०० चौ.मी.जमीन भाडेतत्वावर दिलेली सदर जागेचा ताबा मे.एन.जी.व्हेंचर्स यांना देण्यात आले आहे. तथापि प्रत्यक्ष जागेवर सुरू असलेल्या कामास महामंडळामार्फत पुढील आदेशापर्यंत स्थगिती देण्यात येत आहे, असे पत्र पुणे महानगरपालिकेकडे दाखल झाले होते. त्यानुसार पुणे महानगरपालिकेने मे.एन.जी.व्हेंचर्स तर्फे रणजीत अशोक दरक (विकसक) यांचा उपरोक्त दाखल व्यापारी /वाणिज्य इमारतीचा प्रस्ताव फेटाळण्यात आले आहे.

मा.सभासद सौ.नंदिनी सिध्दार्थ धेंडे यांनी दि.१०/३/२०२६ रोजी शहर सुधारणा समितीकडे पत्र सादर केले आहे. सदर पत्राद्वारे यांनी खालील प्रमाणे मागणी केलेली असून, त्यानुसार मा.शहर सुधारणा समिती मार्फत ठराव मान्य करण्यात आलेला आहे.

१) संबंधीत म.रा.र.वि.म.यांच्या भूखंडावरील सार्वजनिक निम सार्वजनिक झोन (PSP ZONE) यात UDCPR नियमावली अगर अन्य कोणत्याही कायद्याने या भूखंडाचा वापर बदल ना करता हा सार्वजनिक/निमसार्वजनिक (PSP ZONE) झोन कायम करण्यात यावा.

२) तसेच शासनाने या भूखंडावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर गरीब विद्यार्थी वसतीगृह, इतर लोकोपयोगी उपक्रम व भव्य स्मारकाचा विस्तार करण्यास.

३) तसेच राज्य शासनाने या वर्षाच्या अर्थसंकल्पात र.रू.२५०० कोटी निधी उपलब्ध करून द्यावा या करिता मा.मुख्य पुणे मनपा यांची मान्यता मिळावी.

मंगळवार पेठ न.भू.क्र.४०५ ही मिळकत डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनच्या लगत आहे. त्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवनाच्या विस्तारीकरणासाठी शिफारस आहे. याबाबत मान्य विकास आराखडा २०१७ मध्ये सदरच्या मिळकतीचा झोन वाणिज्य आहे. PSP झोन करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच या भूखंडावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर गरीब विद्यार्थी वसतिगृह व इतर लोकोपयोगी उपक्रम व भव्य स्मारकाचा विस्तार करणेस व त्यास २५०० कोटी निधी उपलब्ध करणेबाबत शासन स्तरावर निर्णय होणे आवश्यक आहे.

तसेच संदर्भ क्र.५ च्या उपसूचनेनुसार -

विषय क्र.५७४ च्या अभिप्राय स्विकारत असता डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनच्या विस्तारीकरण करणेकरिता मे.महाराष्ट्र शासनाकडे र.रू.२५ कोटी रूपयांची मागणी पुणे मनपा करीत असताना, सदर मागणीचा प्रस्ताव शासनाने पुढील ३० दिवसांत मान्य करावा यासाठी पुणे मनपाने पाठपुरावा करावा तथापी त्यास दिरंगाई झाल्या ऑक्टोंबर २०२६ ला सदर कामास पुणे मनपा अर्थसंकल्पात तरतुदीतून सुरूवात करावी.

अशा आशयाचा मा.महा.आयुक्तांनी दिलेला अभिप्राय स्विकृत करून मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

विषय क्र.१४२

संदर्भ – १) टेंडर क्र.Water Supply 205/263

२) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पापु/५४,दि.३०/४/२०२६ चे पत्र.

३) मा.अजित घुले, मा.मारूती तुपे, मा.पुनीत जोशी व मा.श्रीकांत जगताप यांची दि.३/७/२०२६ ची उपसूचना.

४) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.९२,दि.३/७/२०२६

५) मा.स्थायी समिती ठराव क्र.५७५,दि.३०/७/२०२६

मा.शहर सुधारणा समितीची शिफारस विचारात घेऊन तसेच मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे पेठ शेवाळवाडी स.नं.१७ येथील जुनी अस्तित्वातील १५०००० लिटर क्षमतेची पाण्याची टाकी (ESR) निर्लेखित (Demolished) करणेस व पाडणेस. तसेच संदर्भ क्र.३ च्या उपसूचनेनुसार – पुणे पेठ शेवाळवाडी स.नं.१७ येथील जुनी अस्तित्वातील पाण्याची टाकी निर्लेखित करून नवीन टाकी बांधताना भविष्यातील त्या परिसरातील लोकसंख्येचा विचार करून टाकीची पाणी साठवण क्षमता वाढविण्यात यावी. या संदर्भात त्या प्रभागातील सर्व स्थानिक सभासदांना विश्वासात घेवून याबाबत व्यवस्था करणेस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

विषय क्र.१४३

संदर्भ – १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पर्यावरण/३३१,दि.२९/७/२०२६

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.५७७,दि.३०/७/२०२६

मा.महा.आयुक्त यांनी केलेली शिफारस विचारात घेऊन –

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसूची **ड** प्रकरण ५(२)(२) मधील तरतुदींच्या अनुषंगाने पर्यावरण विभागाकडील पर्यावरण सद्यस्थिती अहवाल (Environmental Status Report) सन २०२५–२६ तयार करणेकरिता सायन्स अँड टेन्कॉलॉजी पार्क या संस्थेची नेमणूक करणेस व त्यांचेसोबत करारनामा करून र.रू.१० लक्ष पर्यंत काम करून घेणेस खालील बाबींस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसूची **ड** प्रकरण ५(२)(२) मधील तरतुदींच्या अनुषंगाने पर्यावरण विभागाकडील पर्यावरण सद्यस्थिती अहवाल (Environmental Status Report) सन २०२५–२६ तयार करणेकरिता सायन्स अँड टेन्कॉलॉजी पार्क या संस्थेची नेमणूक करणेस व त्यांचेसोबत करारनामा करून पुढील कार्यवाही करण्यास व उपरोक्त कामाकरिता बजेट कोड RE26E114 वार्षिक पर्यावरण सद्यस्थिती अहवाल तयार करणे व छपाई करणे या मधून अधिकतम र.रू.१० लक्ष पर्यंत खर्च करणेस.

विषय क्र.१४४

संदर्भ – १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पथ/३५३,दि.३०/७/२०२६

२) मा.वित्तीय समिती दि.१९/६/२०२६ रोजीची मान्यता जा.क्र.मुले/११४०,दि.२४/६/२०२६

३) मा.स्थायी समिती ठराव क्र.५८८,दि.३०/७/२०२६

मा.महा.आयुक्त यांनी केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे ग्रँड चॅलेंज टूर-२०२७ चे आवश्यक कामांकरिता पुणे महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतुदीमधून पुणे महानगरपालिकेच्या मुख्य अभियंता (पथ) कार्यालयास रस्ते विषयक व इतर तद्नुषंगिक कामांस तसेच विद्युत विषयक कामांकरिता मा.महा.आयुक्त यांच्या विषयपत्रातील नमूद वर्गीकरण तक्त्यानुसार र.रू.११४,८९,७३,०००=०० (अक्षरी - एकशे चौदा कोटी एकोणनव्वद लक्ष त्र्याहत्तर हजार मात्र) चे वर्गीकरण करणेस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

मा.शहर सुधारणा समितीचे ठराव

विषय क्र.१४५

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांनी जा.क्र.मआ/शहर अभि/१४०,दि.९/७/२०१९ चे पत्र
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१३९, दि.३१/७/२०१९
३) मनपा ठराव क्र.२९६,दि.२१/९/२०२१
४) मा.श्रीनाथ भिमाले व मा.पृथ्वीराज सुतार यांची दि.१८/२/२०२६ ची उपसूचना.
५) मनपा ठराव क्र.४९५,दि.१८/२/२०२६
६) मा.धीरज घाटे व मा.पृथ्वीराज सुतार यांची दि.२३/३/२०२६ ची उपसूचना.
७) मनपा ठराव क्र.५६१,दि.२३/३/२०२६
८) मा.पृथ्वीराज सुतार व मा.हरिदास चरवड यांची दि.२२/६/२०२६ ची उपसूचना.
९) मनपा ठराव क्र.३२,दि.२२/६/२०२६

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन-

पुणे पेठ लोहगाव स.नं.२०६/३ सि.स.नं.९७ मधून जाणाऱ्या कलम २०५ अन्वये आखलेल्या ९.१४ मी. रूंदीच्या रस्त्याचा कलम २०५ चा दर्जा काढून टाकून त्यास पूर्वीप्रमाणे अंतर्गत रस्ता म्हणून दर्जा देणेबाबत एमआरटीपी ॲक्ट १९६६ चे कलम ३७ ची कार्यवाही करणेसाठी मान्यता दयावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप - सदर विषयाचा विचार माहे ऑगस्ट २०२६ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा ठराव क्र.१२१,दि.२९/७/२०२६चा झाला आहे.)

विषय क्र.१४६

संदर्भ - १) मा.स्वप्नाली पंडित व मा.स्मिता वस्ते, अध्यक्ष, शहर सुधारणा समिती यांचे दि.२०/४/२०२६ चे पत्र.
२) मा.श्रीकांत जगताप, मा.सपना छाजेड, मा.पुनित जोशी व मा.मारूती तुपे यांची दि.३/७/२०२६ ची उपसूचना.
३) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.७८,दि.३/७/२०२६

मा.शहर सुधारणा समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून व संदर्भ क्र.२ च्या उपसूचनेनुसार -

प्रभाग क्र.२५ येथील नदीपात्रात नागरिकांकडून निर्माल्य, कचरा टाकला जातो. नदीवरील पुलावर उंच जाळ्या जर बसविण्यात आल्या तर नक्कीच ह्या टाकल्या जाणाऱ्या कचऱ्यावर नियंत्रण ठेवता येईल. तसेच पुलाच्या दोन्ही बाजूस जर निर्माल्य कलश ठेवले तर नागरिक त्यात निर्माल्य टाकतील. तरी नदीपात्रातील दोन्ही बाजूस निर्माल्य कलश बसवून जाळ्या लावण्यास तसेच पुणे महानगरपालिका हद्दीतील नदीपात्रालगत तसेच कॅनॉल लगत जाळ्या बसविण्यात याव्यात व निर्माल्य कलश बसवावेत व कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करणेस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

विषय क्र.१४७

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.मआ/TDR/२३,दि.२०/४/२०२६
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.८७,दि.३/७/२०२६

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणामुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे एप्रिल २०२६ मध्ये खालील प्रमाणे अदा करण्यात आलेल्या डी.आर.सी.ची माहिती मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे.

अ.क्र	आरक्षणाचा स.नं.	आरक्षणाचा प्रकार	डी.आर.सी होल्डर नाव	टिडीआर झोन	७/१२ नुसार झोन	टिडीआर देय क्षेत्र चौ.मी.	डीआरसी क्र.	डीआरसी दिल्याचा दिनांक
१	मौजे पुणे कोंढवा(बु)येथील स.नं.१९/१अ/ २/१ब/२(नवीन) स.नं.१९/१/१अ/ १अ/१ (जुना)	१८ मी. डी.पी. रस्ता	सोभा लिमिटेड	विरळ वस्ती	५५२.५५ चौ.मी.	५५२.०० चौ.मी. X २.०५ = ११३१.६० चौ.मी.	००६४३८	एप्रिल २०२६

विषय क्र.१४८

संदर्भ – १) मा.हिमाली कांबळे, मा.निलेश आल्हाट व मा.सौ.उज्वला यादव यांचे दि.११/३/२०२६ चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१४२,दि.२०/३/२०२६
३) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.मआ/शहर अभियंता/३७,दि.२२/४/२०२६ चा अभिप्राय विचारासाठी
४) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.८९,दि.३/७/२०२६

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २६,दि.५/१/२०२५ अन्वये मान्य विकास आराखडयानुसार CC-15 हे रिझर्व्हेशन प्रस्तावित करण्यात आले होते. त्यानंतर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१(१) अन्वये Modification Numbar us/90-m6.2 नुसार प्रस्तावित रिझर्वेशन CC-15 Reservation deleted and Included in PSP Zone असे समाविष्ठ केले आहे. मंगळवार पेठ न.भू.क्र.४०५ हि मिळकत डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनच्या लगत आहे. त्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनच्या विस्तारीकरणासाठी पुणे महानगरपालिकेने सदर आरक्षण प्रस्तावित केले होते. आंबेडकर भवनाच्या परिसरात अनेक विद्यार्थी MPSC/UPSC ची तयारी करण्यासाठी प्रशिक्षण घेण्यासाठी व अभ्यास करण्यासाठी येत असतात. त्यामुळे त्यांच्यासाठी व परिसरातील नागरिकांच्या सेवासुविधेसाठी आरक्षित क्षेत्राच्या १५% भूखंड किंवा पूर्व बांधकामाच्या १५% बांधीव बांधकाम क्षेत्र महानगरपालिकेला विकसित करून हस्तांतरित करणे आवश्यक आहे. याबाबत शासन स्तरावर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ च्या अनुषंगाने कार्यवाही बाबत शासनाकडे मागणी करण्यात आली होती. जा.क्र.टी.पी.एस.१८२४/८५६/२०२४/नवि १३,दि.१२/६/२०२४ अन्वये मा.सह.सचिव, महाराष्ट्र शासन यांनी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाशी सविस्तर चर्चा करून फेरबदलांच्या अनुषंगाने सविस्तर फेर अहवाल सादर करणेस पत्रान्वये कळविले होते.त्यानुसार अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य , र.वि.महा.पुणे यांच्या समावेत मा.महापालिका आयुक्त यांच्या दालनात बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे निविदा प्रक्रिया पूर्ण करून सदर जागा ९९ वर्षे कराराने वाणिज्य वापराकरिता भाडे पट्टयाने हस्तांतरित केली असल्याचे नमूद केले व त्यामुळे पुणे

महानगरपालिकेचे पत्र क्र.४१६९,दि.६/६/२०२४ च्या पत्रानुसार नमूद १५% भूखंड किंवा पूर्ण बांधकामाच्या १५% बांधीव बांधकाम क्षेत्र सोडणे महामंडळाच्या शक्य नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे याबाबत मे.शासनाने निर्णय घेणे योग्य होईल असे निर्देश दिले. तद नंतर अप्पर सचिव, महाराष्ट्र शासन, जा.क्र.टिपीएस-१८२४/२६/२०२४/नवि-१३,दि.५/८/२०२४ अन्वये पुणे येथील महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या मालकीचे न.भू.क्र.४०५ मधील क्षेत्र ८९०० चौ.मी.सार्वजनिक निम-सार्वजनिक वापर बंद होणार असल्याने, सदर जागेबाबत मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली -२०२० मधील विनियम क्र.४.१(V) नुसार कार्यवाही करणेस हरकत नाही,असे आदेश दिलेले आहे.महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित जा.क्र.मारविम/०२/वाणिज्य विभाग/मंगळवार पेठ/२०२५/५९७१ अन्वये महामंडळाने मंगळवार पेठ, पुणे येथील नगर भुमापन क्र.४०५ मधील ८९०० चौ.मी.जमीन भाडेतत्वावर दिलेली सदर जागेचा ताबा मे.एन.जी.व्हेंचर्स यांना देण्यात आले आहे. तथापि प्रत्यक्ष जागेवर सुरू असलेल्या कामास महामंडळामार्फत पुढील आदेशापर्यत स्थगिती देण्यात येत आहे,असे पत्र पुणे महानगरपालिकेकडे दाखल झाले होते. त्यानुसार पुणे महानगरपालिकेने मे.एन.जी.व्हेंचर्स तर्फे रणजीत अशोक दरक (विकसक) यांचा उपरोक्त दाखल व्यापारी/वाणिज्य इमारतीचा प्रस्ताव फेटाळण्यात आले आहे.मा.सभासद हिमाल कांबळे, मा.निलेश आल्हाट व मा.उज्वला यादव यांनी दि.११/३/२०२६ रोजी मा.शहर सुधारणा समितीकडे पत्र सादर केले आहे. सदर पत्राद्वारे यांनी संबंधित म.रा.र.वि.म.जागेवरील असणारे वाणिज्यिक आरक्षण बदलून सार्वजनिक आरक्षण करण्यात यावे आणि या जागेवर महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य स्मारक पुणे महानगरपालिका ही जागा ताब्यात घेऊन महानगरपालिकेच्या वतीने स्मारक उभारण्यात यावे,अशी मागणी केलेली आहे. मंगळवार पेठ न.भू.क्र.४०५ हि मिळकत डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनच्या लगत आहे. त्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवनाच्या विस्तारीकरणासाठी न.भू.क्र.४०५ हि मिळकत महानगरपालिकेच्या ताब्यात मिळणेस व त्यानुसार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य स्मारक उभारणे या करिता सदरची जागा महानगरपालिकेच्या ताब्यात मिळणेसाठी शासनस्तरावर निर्णय होणे आवश्यक आहे. अशा आशयाचा मा.महापालिका आयुक्त यांनी पाठविलेला अभिप्राय स्विकृत करून मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

<u>विषय क्र.१४९</u>

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.मआ/TDR/३८,दि.२२/४/२०२६
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.९०,दि.३/७/२०२६

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणामुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे एप्रिल २०२६ मध्ये खालील प्रमाणे अदा करण्यात आलेल्या डी.आर.सी.ची माहिती मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे.

अ.क्र	मिळकतीचा तपशील	आरक्षणाचा प्रकार	डी.आर.सी होल्डरचे नाव	टिडीआर झोन	क्षेत्र चौ.मी.	डीआरसी क्र.	डीआरसी दिल्याचा दिनांक
१	पुणे, हडपसर,स.नं. ११०अ/१,हिस्सा नं. ४+९ब+१२ रामटेकडी	झोपडपट्टी पुनर्वसन योजना	मे.नाईकनवरे डेव्हलपर्स प्रा. लि.	सी झोन नुसार	९०७३.०६४ चौ.मी (झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील पुनर्वसन इमारत ई साठी आर.सी.सी.व वीट बांधकाम पुर्णत्वापोटीचा ३५% टीडीआर)	००४८०८	एप्रिल २०२६

विषय क्र.१५०

संदर्भ – १) मा.हरिदास चरवड व मा.सचिन मोरे यांचे दि.१३/५/२०२६ चे पत्र.

२) मा.श्रीकांत जगताप व मा.सपना छाजेड यांची दि.३/७/२०२६ ची उपसूचना.

३) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.९६,दि.३/७/२०२६

मा.शहर सुधारणा समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून–

नवीन समाविष्ट गावांमधील वडगाव बुद्रुक–वडगाव खुर्द स्मशानभूमीच्या विस्तारीकरणासाठी तसेच स्वतंत्र दशक्रिया विधा घाट, पार्किंग व पूरक नागरी सुविधा विकसित करण्यासाठी सर्वे नं.६१ मधील पाटबंधारे विभागाची जागा पुणे महानगरपालिकेस हस्तांतरित/वापरासाठी उपलब्ध करून मिळावी,यासाठी महाराष्ट्र शासनाच्या पाटबंधारे विभागाकडे तातडीने अधिकृत प्रस्ताव सादर करण्यात यावा. पुणे महानगरपालिकेमध्ये समाविष्ट झालेल्या नवीन गावांमध्ये झपाट्याने नागरीकरण वाढत असून, पूर्वी गावाच्या बाहेरील भागात असलेल्या अनेक स्मशानभूमी आज मध्यवस्तीमध्ये आलेल्या आहेत. त्यामुळे त्या ठिकाणी अंत्यविधी,दशक्रिया विधी, पार्किंग, नागरिकांची ये–जा, वाहतूक व्यवस्था तसेच मुलभूत सुविधांचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.प्रभाग क्र.३४ मधील वडगाव बुद्रुक व वडगाव खुर्द येथील विद्यमान स्मशानभूमी सिंहगड रोड परिसरात कॅनॉलगत सर्वे नं.६० मध्ये स्थित आहे. सदर स्मशानभूमीचा वापर वडगाव बुद्रुक, वडगाव खुर्द, नांदेड, माणिकबाग,हिंगणे, धायरी, नऱ्हे तसेच परिसरातील हजारो नागरिकांकडून केला जातो. मात्र वाढती लोकसंख्या व नागरी विस्तार लक्षात घेता सद्यस्थितीत उपलब्ध जागा अत्यंत अपुरी पडत आहे. विशेषत: अंत्यविधी व दशक्रिया विधी हे एकाच ठिकाणी होत असल्यामुळे मोठ्या प्रमाणात गर्दी निर्माण होते.त्यामुळे नागरिकांना मानसिक, सामाजिक व व्यवस्थापनाच्या दृष्टीने मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.पार्किंगची सुविधा नसल्याने वाहतूक कोंडीची समस्या देखील निर्माण होत आहे. तसेच राजाराम पूल परिसरापासून ते पानशेतपर्यंतच्या ग्रामीण भागातील अनेक नागरिक आज रोजगार, व्यवसाय व वास्तव्यासाठी पुणे शहरामध्ये स्थायिक झालेले आहे. या सर्व नागरिकांकडून देखील सिंहगड रोडवरील सदर स्मशानभूमीचा मोठ्या प्रमाणावर वापर अंत्यविधी व दशक्रिया विधीसाठी केला जातो. त्यामुळे शहरासह ग्रामीण भागातील नागरिकांवरही या स्मशानभूमीचा मोठा ताण येत असून, भविष्यातील गरज लक्षात घेता सदर स्मशानभूमीचे विस्तारीकरण करणे अत्यंत आवश्यक बनले आहे. सदर स्मशानभूमीच्या लगत सर्वे नं.६१ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या पाटबंधारे विभागाची एक एकरपेक्षा अधिक जागा उपलब्ध असून, सद्यस्थितीत ती जागा कोणत्याही प्रभावी वापरात नसल्याचे निदर्शनास येते. सदर जागा पुणे महानगरपालिकेस वापरासाठी उपलब्ध झाल्यास त्या ठिकाणी स्वतंत्र दशक्रिया विधी घाट, पार्किंग व्यवस्था, प्रतीक्षागृह, स्वच्छतागृह, पिण्याच्या पाण्याची सुविधा, अंतर्गत रस्ते, शेड, विद्युत व प्रकाश व्यवस्था तसेच इतर पूरक नागरी सुविधा विकसित करणे शक्य होणार आहे. यामुळे विद्यमान स्मशानभूमीवरील ताण कमी होऊन नागरिकांना सन्मानपूर्वक व सुस्थितीत अंत्यसंस्कार व धार्मिक विधी करण्यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध होतील. तसेच भविष्यकाळातील वाढती लोकसंख्या लक्षात घेता ही जागा सार्वजनिक हिताच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण ठरणार आहे. तरी पुणे महानगरपालिकेमार्फत वडगाव बुद्रुक–वडगाव खुर्द स्मशानभूमीच्या विस्तारीकरणासाठी तसेच स्वतंत्र दशक्रिया घाट व पूरक नागरी सुविधा विकसित करण्यासाठी सर्वे नं.६१ मधील महाराष्ट्र शासनाच्या पाटबंधारे विभागाच्या मालकीची एक एकरपेक्षा अधिक उपलब्ध जागा पुणे महानगरपालिकेस हस्तांतरित/वापरासाठी उपलब्ध करून मिळावी,यासाठी महाराष्ट्र शासनाच्या पाटबंधारे विभागाकडे तातडीने अधिकृत प्रस्ताव सादर करण्यात यावा. तसेच सदर जागा उपलब्ध झाल्यानंतर त्या ठिकाणी स्वतंत्र दशक्रिया विधी घाट, पार्किंग व्यवस्था, प्रतीक्षागृह,स्वच्छतागृह, पिण्याच्या पाण्याची सुविधा, अंतर्गत रस्ते, शेड , विद्युत व्यवस्था,हरितीकरण व इतर आवश्यक नागरी सुविधा विकसित करण्यासाठी स्वतंत्र विकास आराखडा तयार करून आवश्यक निधींची तरतूद करण्यात यावी.सदर विषय हा

नागरिकांच्या भावनिक, धार्मिक, सामाजिक व सार्वजनिक हिताशी निगडीत असल्याने पुणे महानगरपालिका प्रशासनाने या प्रस्तावास प्राधान्य देऊन शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा करावा. संदर्भ क्र.२ च्या उपसूचनेनुसार नविन समाविष्ट गावामधील गांभिर्यता विचारात घेऊन व नागरिकांच्या सोयीसाठी प्र.क्र.३५ सनसिटी-माणिकबाग या प्रभागात सर्वे नं.६१ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या पाठबंधारे विभागाची जागा पुणे मनपाने ११ वर्षे भाडेकरार/लिजने घेऊन त्याठिकाणी स्मशानभूमी,दशक्रिया विधी घाट, प्रतिक्षागृह, स्वच्छता पार्किंग व्यवस्था पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, रस्ते, शेड, विद्युत व प्रकाश व्यवस्था व इतर अनुषंगिक कामे करण्यात यावीत. सदरची कार्यवाही तातडीने करणेस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

<u>विषय क्र.१५१</u>

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.मआ/TDR/८२,दि.७/५/२०२६
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.९७,दि.३/७/२०२६

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणामुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे मे २०२६ मध्ये खालील प्रमाणे अदा करण्यात आलेल्या डी.आर.सी.ची माहिती मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे.

अ.क्र	मिळकतीचा तपशील	आरक्षणाचा प्रकार	डी.आर.सी होल्डरचे नाव	टिडीआर झोन	क्षेत्र चौ.मी.	डीआरसी क्र.	डीआरसी दिल्याचा दिनांक
१	मौजे,कोथरूड सि.स.नं १७२१, १७२३ ते १७२७(स.नं.४६ पैकी ४७ पैकी) श्रावणधारा पुणे	झोपडपट्टी पुनर्वसन योजना	मे.किर्तीवर्धन डेव्हलपर्स अँड बिल्डर्स	झोन C	३२१३.३२ चौ.मी. (पुनर्वसन योजनेतील सी इमारतीतील विक्री घटकाच्या २४ सदनिका पुनर्वसन घटकामध्ये रूपांतरीत केल्यापोटी निर्माण होणारा टीडीआर)	००४८११	मे २०२६

<u>विषय क्र.१५२</u>

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.मआ/TDR/९१,दि.१३/५/२०२६
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.९८,दि.३/७/२०२६

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणामुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे मे २०२६ मध्ये खालील प्रमाणे अदा करण्यात आलेल्या डी.आर.सी.ची माहिती मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे.

अ.क्र	आरक्षणाचा स.नं.	आरक्षणाचा प्रकार	डी.आर.सी होल्डर नाव	टिडीआर झोन	७/१२ नुसार झोन	टिडीआर देय क्षेत्र चौ.मी.	डीआरसी क्र.	डीआरसी दिल्याचा दिनांक
१	पुणे धायरी स.नं. १२५/५/९/६/२/ ७/१२/प्लॉट नं./३ (जुना स.नं. १२५/५/९ १२५/६/२ १२५/१२	अॅमेनिटी स्पेस	सुयोग अंजनी अविष्कार असो.तर्फे भागीदार १)कविश राजू	विरळ वस्ती	१९८१.९६ चौ.मी.	१९८१.९६ चौ.मी. X २.०५ = ४०६३.०१ पैकी १२१५.०० चौ.मी.	००६५३०	मे २०२६

	१२५/७)		ठकवानी २) हेमेंद्र केशवलाल शहा ३) चेतन पुरूषोत्तम पटेल			२८४८.०१ चौ.मी.	००६५३१	

<u>विषय क्र.१५३</u>

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.मआ/TDR/९२,दि.१३/५/२०२६
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.९९,दि.३/७/२०२६

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणामुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे मे २०२६ मध्ये खालील प्रमाणे अदा करण्यात आलेल्या डी.आर.सी.ची माहिती मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे.

अ.क्र	मिळकतीचा तपशील	आरक्षणाचा प्रकार	डी.आर.सी होल्डरचे नाव	टिडीआर झोन	क्षेत्र चौ.मी.	डीआरसी क्र.	डीआरसी दिल्याचा दिनांक
१	पुणे पर्वती,टीपी स्कीम नं.३,फायनल प्लॉट क्र.२ब,(स.नं.१३४) दांडेकर पूल व सदाशिव पेठ, फा.प्लॉटक्र.२८ (पैकी) (स.नं.१३५पै) दांडेकर पूल.	झोपडपट्टी पुनर्वसन योजना	मे.नाईकनवरे डेव्हलपर्स प्रा.लि.	रेडी रेकनर नुसार	९७८६.१४ चौ.मी.	००४८१५	मे २०२६

<u>विषय क्र.१५४</u>

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.मआ/TDR/९३,दि.१३/५/२०२६
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१००,दि.३/७/२०२६

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणामुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे मे २०२६ मध्ये खालील प्रमाणे अदा करण्यात आलेल्या डी.आर.सी.ची माहिती मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे.

अ.क्र	मिळकतीचा तपशील	आरक्षणाचा प्रकार	डी.आर.सी होल्डरचे नाव	टिडीआर झोन	क्षेत्र चौ.मी.	डीआरसी क्र.	डीआरसी दिल्याचा दिनांक
१	गणेश पेठ, पुणे येथील स.नं.२३७/१, २३७/२, २३७/३अ,२३७/३ब, २३७/३ड,२३७/३ई, २३७/३क, २३७/४, २३७/५,२३७/६,२३७/७	झोपडपट्टी पुनर्वसन योजना	मे.राफे लकडवाला व्हेंचर	रेडीरेकनर प्रमाणे	८६४.८०चौ.मी. (पुनर्वसन इमारतीसाठी भागश: आर.सी.सी.व वीट बांधकाम पूर्णत्वापोटीचा निर्माण होणारा ३५%टीडीआर)	००४८१२	मे २०२६

विषय क्र.१५५

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.मआ/TDR/९४,दि.१३/५/२०२६
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१०१,दि.३/७/२०२६

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणामुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे मे २०२६ मध्ये खालील प्रमाणे अदा करण्यात आलेल्या डी.आर.सी.ची माहिती मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे.

अ.क्र	मिळकतीचा तपशील	आरक्षणाचा प्रकार	डी.आर.सी होल्डरचे नाव	टिडीआर झोन	क्षेत्र चौ.मी.	डीआरसी क्र.	डीआरसी दिल्याचा दिनांक
१	पर्वती,फायनल प्लॉट क्र. ५७१ब,(स.नं.१२९)पुणे	झोपडपट्टी पुनर्वसन योजना	मे.केदार असोसिएटस्	झोन नुसार सी	८००.९१ चौ.मी. (झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत पुनर्वसन इमारतीचे अभिहस्तांतरणपोटीचा १०% टी.डी.आर.	००४८०९	मे २०२६

विषय क्र.१५६

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.मआ/TDR/९५,दि.१३/५/२०२६
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१०२,दि.३/७/२०२६

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणामुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे एप्रिल २०२६ मध्ये खालील प्रमाणे अदा करण्यात आलेल्या डी.आर.सी.ची माहिती मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे.

अ.क्र	आरक्षणाचा स.नं.	आरक्षणाचा प्रकार	डी.आर.सी होल्डर नाव	टिडीआर झोन	७/१२ नुसार झोन	टिडीआर देय क्षेत्र चौ.मी.	डीआरसी क्र.	डीआरसी दिल्याचा दिनांक
१	पुणे धायरी स.नं. १२५/५/९/६/२ /७/१२/प्लॉट नं./२(जुना स.नं. १२५/५/९ १२५/६/२, १२५/७, १२५/१२)	११० मी. रस्ता (रिंग रोड)	सुयोग अंजनी अविष्कार असो.तर्फे भागीदार १)कविश राजू ठकवानी २) हेमेंद्र केशवलाल शहा ३) चेतन पुरूषोत्तम पटेल	विरळ वस्ती	१९४६.३० चौ.मी.	१९४६.३० चौ.मी. X २.०० = ३८९२.६० चौ.मी. पैकी ११५०.०० चौ.मी. २७४२.६० चौ.मी.	००६५२४ ००६५२५	एप्रिल २०२६

विषय क्र.१५७

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.मआ/TDR/९६,दि.१३/५/२०२६
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१०३,दि.३/७/२०२६

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणामुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे एप्रिल

२०२६ मध्ये खालील प्रमाणे अदा करण्यात आलेल्या डी.आर.सी.ची माहिती मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे.

अ.क्र	आरक्षणाचा स.नं.	आरक्षणाचा प्रकार	डी.आर.सी होल्डर नाव	टिडीआर झोन	७/१२ नुसार झोन	टिडीआर देय क्षेत्र चौ.मी.	डीआरसी क्र.	डीआरसी दिल्याचा दिनांक
१	मौजे पुणे धायरी स.नं.२२/५ए/७पै	गार्डन (जी-४एन)	भाऊसाहेब तबाजी आढाव	विरळ वस्ती	१९३०.०० चौ.मी.	१९३०.०० चौ.मी. x २.०० = ३८६०.०० चौ.मी.	००६५१६	एप्रिल २०२६

<u>विषय क्र.१५८</u>

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.मआ/TDR/९७,दि.१३/५/२०२६

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१०४,दि.३/७/२०२६

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणामुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे मे २०२६ मध्ये खालील प्रमाणे अदा करण्यात आलेल्या डी.आर.सी.ची माहिती मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे.

अ.क्र	आरक्षणाचा स.नं.	आरक्षणाचा प्रकार	डी.आर.सी होल्डर नाव	टिडीआर झोन	७/१२ नुसार झोन	टिडीआर देय क्षेत्र चौ.मी.	डीआरसी क्र.	डीआरसी दिल्याचा दिनांक
१	मौजे वडगाव खुर्द स.नं.४८/२	१८ मी. डी.पी.रस्ता पार्क (पीके-३)	मे.लगड प्रॉपर्टीज एलएलपी तर्फे भागीदार सचिन बी.लगड	विरळ वस्ती	८००.०० चौ.मी.	६४८.८९	००६५२०	मे २०२६
२			मे.लगड ब्रदर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे भागीदार व्यंकट एन.लगड			४५४.२३ ९७.३३ ९७.३३ एकूण- ६४८.८९	००६५२१ ००६५२२ ००६५२३	

<u>विषय क्र.१५९</u>

संदर्भ - १) मा.किशोर धायरकर व मा.हिमाली कांबळे यांचे दि.८/७/२०२६ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.११४,दि.१७/७/२०२६

प्रभाग क्र.१४ब,मध्ये गेल्या ५० ते ६० वर्षापासून परिसरातील नागरिकांसाठी एक ही उद्यान विकसित करण्यात आलेले नाही. त्याअनुषंगाने पुणे पेठ मुंढवा स.नं.८५/८६ (पी) येथील जागा ही उद्यानासाठी आरक्षित करण्यात आलेली आहे. उद्यान विकसित करणेसाठी सन २०२६-२७ च्या अंदाजपत्रकात तरतूद करण्यात आलेली आहे.

तरी सदर जागेवर उद्यान विकसित करणेस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

<u>विषय क्र.१६०</u>

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.मआ/TDR/२३५,दि.२९/६/२०२६
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१२०,दि.१७/७/२०२६

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणामुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे जून २०२६ मध्ये खालील प्रमाणे अदा करण्यात आलेल्या डी.आर.सी.ची माहिती मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे.

अ.क्र	आरक्षणाचा स.नं.	आरक्षणाचा प्रकार	डी.आर.सी होल्डर नाव	टिडीआर झोन	७/१२ नुसार झोन	टिडीआर देय क्षेत्र चौ.मी.	डीआरसी क्र.	डीआरसी दिल्याचा दिनांक
१	पुणे पेठ महंमदवाडी, स.नं.४९/५	३०चौ.मी. डीपी रस्ता व अनबिल्डेबल क्षेत्र	श्री.धनंजय यशवंत जाधव	विरळ वस्ती	१६००.०० चौ.मी.	१५५७.४० X २.०० = ३११४.८०	००६५६६	जून २०२६

<u>विषय क्र.१६१</u>

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.मआ/TDR/२३६,दि.२९/६/२०२६
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१२१,दि.१७/७/२०२६

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणामुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे जून २०२६ मध्ये खालील प्रमाणे अदा करण्यात आलेल्या डी.आर.सी.ची माहिती मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे.

अ.क्र	मिळकतीचा तपशील	आरक्षणाचा प्रकार	डी.आर.सी होल्डरचे नाव	टिडीआर झोन	क्षेत्र चौ.मी.	डीआरसी क्र.	डीआरसी दिल्याचा दिनांक
१	मौजे घोरपडी संगमवाडी टी.पी.स्कीम ०३ फायनल प्लॉट नं.१३२ पै, ताडीवाला रोड, पुणे	झोपडपट्टी पुनर्वसन योजना	मे.युनिटी कन्स्ट्रक्शन	रेडीरेकनर प्रमाणे	१३६४.६५चौ.मी. (जोते पुर्णत्वापोटीचा २५ टक्के टीडीआर.)	००४८२१	जून २०२६

<u>विषय क्र.१६२</u>

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.मआ/TDR/२४१,दि.१/७/२०२६
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१२२,दि.१७/७/२०२६

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणामुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे जून २०२६ मध्ये खालील प्रमाणे अदा करण्यात आलेल्या डी.आर.सी.ची माहिती मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे.

अ.क्र	आरक्षणाचा स.नं.	आरक्षणाचा प्रकार	डी.आर.सी होल्डर नाव	टिडीआर झोन	७/१२ नुसार झोन	टिडीआर देय क्षेत्र चौ.मी.	डीआरसी क्र.	डीआरसी दिल्याचा दिनांक
१	पुणे मौजे कोंढवा बु.जुना स.नं. ५६/१०/१ ५६/१०/१/१३अ	६० मी. डी.पी. रस्ता व १२ मी. सर्व्हिस रस्ता	मे.श्री. बालाजी कन्स्ट्रक्शन तर्फे	विरळ वस्ती	४४४.७८ चौ.मी.	३८२.१८ चौ.मी. X २.०५ = ७८३.४६	००६५६४	जून २०२६

	५६/१०/८ नवीन स.नं. ५६/१०/१/८/१ /१३अ		श्री.प्रदीप नरसिंग राजकोंडा , श्री.मनोद नरसिंग राजकोंडा व श्री.चेतन नरसिंग राजकोंडा			चौ.मी.		

मा.महिला व बाल कल्याण समितीचा ठराव

विषय क्र.१६३

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.मआ/इओ/१२४,दि.१९/५/२०२६
२) मा.महिला व बाल कल्याण समिती ठराव क्र.८०,दि.७/७/२०२६

मा.महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे महानगरपालिका संचलित राजीव गांधी ई-लर्निंग स्कूल व ज्युनिअर सायन्स कॉलेज शिवदर्शन,पर्वती,पुणे इयत्ता ११वी.आणि इ.१२वी.विज्ञान हे महाविद्यालय चालविणेसाठी मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रात नमूद केलेल्या खालील बाबींस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

१) शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून राजीव गांधी ई-लर्निंग स्कूल व ज्युनिअर सायन्स कॉलेज,शिवदर्शन,पुणे इयत्ता ११ वी आणि इ.१२ वी विज्ञान हे महाविद्यालय ऑलिम्पियाड इंटरनॅशनल एज्युकेशनल फाउंडेशन, मुंबई या पात्र संस्थेला चालविणेकामी देणेस, तसेच भाडे आणि सुरक्षा ठेव निर्धारण समितीने निश्चित केलेले भाडे आकारणेस.

२) शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून राजीव गांधी ई-लर्निंग स्कूल व ज्युनिअर सायन्स कॉलेज,शिवदर्शन,पुणे इयत्ता ११ वी आणि इ.१२ वी विज्ञान हे महाविद्यालय ऑलिम्पियाड इंटरनॅशनल एज्युकेशनल फाउंडेशन, मुंबई या पात्र संस्थेला चालविणेकामी संस्थेबरोबर करारनामा करणेचे अधिकार उपआयुक्त (माध्यमिक व तांत्रिक शिक्षण विभाग) यांना देणेस.

३) पेस एज्युकेशनल ट्रस्ट संस्थेकडील सर्व व्यवस्थापन ऑलिम्पियाड इंटरनॅशनल एज्युकेशनल फाउंडेशन, मुंबई या संस्थेकडे हस्तांतरित करणेस.

(टीप-सदर विषयाचा विचार माहे ऑगस्ट २०२६ च्या कार्यपत्रिकेवर घ्यावा असा मनपा ठराव क्र.१२२,दि.२९/७/२०२६ चा झाला आहे.)

मा.सभासदांचे प्रस्ताव

विषय क्र.१६४

संदर्भ – मा.मंजुषा नागपुरे, महापौर यांची दि.२३/७/२०२६ ची सूचना.

-----

१) पुणे शहरात कार्यरत असलेल्या नामांकित औद्योगिक कंपन्या, माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील संस्था व कॉर्पोरेट उद्योगसमूह यांच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीचा (CSR FUND)वापर करून शहरात विविध नागरी, शैक्षणिक, आरोग्यविषयक व पर्यावरणीय विकासकामे राबवली जातात. यासाठी महापालिकेत यापूर्वीच सीएसआर सेल कार्यरत आहे.

२) सद्यस्थितीत महानगरपालिकेतील विविध विभाग (उदा.आरोग्य विभाग, शिक्षण मंडळ, उद्यान विभाग, रस्ते व पायाभूत सुविधा, घनकचरा व्यवस्थापन इत्यादी) आपापल्या स्तरावर स्वतंत्रपणे कॉर्पोरेट संस्थांशी / कंपनीशी संपर्क साधून CSR निधीतून कामे राबवतात.

३) या विस्कळीत पध्दतीमुळे कामांमध्ये पुनरावृत्ती (Duplication) होणे,निधीचा केंद्रीय डेटाबेस उपलब्ध न होणे आणि पारदर्शकतेचा अभाव राहणे अशा अडचणी येतात. यावर मात करण्यासाठी सर्व विभागांमधील CSR कामे पुणे प्रथम सीएसआर सेतू या एकाच मध्यवर्ती कक्षाच्या छताखाली (Single Window System) आणणे अत्यंत आवश्यक आहे.

पुणे प्रथम सीएसआर सेतूद्वारे कामे केंद्रित (Centralized) करण्याचे प्रमुख फायदे –

१. कामांची पुनरावृत्ती टळेल.

२. पारदर्शकता व उत्तरदायित्व (Transparency & Accountability) सर्व CSR निधी, वस्तू व सेवांची नोंद एकाच मध्यवर्ती प्रणालीवर (Centralized Dashboard) राहील. यामुळे वार्षिक ऑडीट करणे सोपे होईल आणि प्रशासकीय पारदर्शकता वाढेल.

३. सिंगल विंडो सुविधा आणि कॉर्पोरेट क्षेत्राचा विश्वास (Single Window System) कंपन्यांना विविध विभागांमध्ये खेटे मारावे लागणार नाहीत.एकाच कक्षातून जलद मंजुरी (Single Window Clearance) मिळाल्यामुळे मोठ्या कॉर्पोरेट कंपन्यांचा महापालिकेवरील विश्वास वाढेल आणि शहरात अधिक CSR निधी आकर्षित होईल.

४. शहराच्या प्राध्यान्यक्रमानुसार विकास (Priority-Based Development) शहराला अत्यंत गरज असलेल्या क्षेत्रांमध्ये (उदा.ई-लर्निंग, अद्ययावत रूग्णालये, महिला कौशल्य विकास, जलसंवर्धन) CSR निधीचे नियोजित व समतोल वाटप करता येईल.

५. एकत्रीकृत डेटाबेस व सनियंत्रण (Unified Database & Monitoring) महापालिकेकडे CSR द्वारे झालेल्या सर्व कामांची, करारांची (MoUS) आणि प्राप्त झालेल्या मालमत्तांची अचूक व अद्ययावत माहिती उपलब्ध राहील.

वर नमूद केलेल्या विषयांस अनुसरून खालील बाबींस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

१.पुणे महानगरपालिकेत पूर्वप्रस्थापित असलेल्या सीएसआर सेलचे पुनर्गठन व नामांतर करून पुणे प्रथम सीएसआर सेतू (Pune Pratham CSR Cell) असे नवीन नाव देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात येत आहे.

२. सर्व विभागांसाठी मध्यवर्ती नियंत्रण व अनिवार्य पूर्वमान्यता (Mandatory Approval)

पुणे महानगरपालिकेचा कोणताही विभाग (उदा.आरोग्य,शिक्षण, उद्यान, रस्ते , समाजकल्याण, अभियांत्रिकी इत्यादी) यापुढे कोणत्याही कंपनी, उद्योगसमूह अथवा स्वयंसेवा संस्थेकडून (NGO) थेट CSR निधी किंवा वस्तू / सेवांच्या स्वरूपात मदत स्वीकारू शकणार नाही.

CSR अंतर्गत होणाऱ्या सर्व प्रकारच्या कामांचे प्रस्ताव, सामंजस्य करार (MoU) आणि निधी/वस्तू स्वीकृती या सर्व प्रक्रिया पुणे प्रथम सीएसआर सेतू कक्षाच्या माध्यमातूनच चालवल्या जातील.

कोणत्याही विभागाने CSR अंतर्गत नवीन काम हाती घेण्यापूर्वी पुणे प्रथम सीएसआर सेतू ची लेखी पूर्वमान्यता घेणे अनिवार्य राहील.

३. कार्यपध्दती आणि अंमलबजावणी

सेंट्रलाइज्ड प्रोजेक्ट बँक (Centralized Project Bank) सर्व विभागांनी त्यांच्या क्षेत्रातील CSR योग्य कामांची यादी पुणे प्रथम सीएसआर सेतू कक्षाकडे सादर करावी.

एकीकृत करार (Unified MoU) कॉर्पोरेट कंपन्यांसोबत होणारे सर्व सामंजस्य करार (MoUs) हे या कक्षाच्या माध्यमातून मान्यतेनेच केले जातील.

४. सदर निर्णयाची अंमलबजावणी तत्काळ प्रभावाने करण्यात यावी आणि याबाबतचे स्पष्ट परिपत्रक सर्व खातेप्रमुख, परिमंडळ उपायुक्त आणि सहाय्यक महापालिका आयुक्त यांना निर्गमित करण्यात यावे.
५.पुणे प्रथम सीएसआर सेतूची पुनर्रचित समिती रचना.
अध्यश्र – मा.महापौर
सदस्य सचिव – उपायुक्त / कक्ष प्रमुख
सदस्य –१.संबंधित अतिरिक्त महापालिका आयुक्त, २. मुख्य लेखा व वित्त अधिकारी ३. मुख्य विधी अधिकारी
६. याबाबतीतील सर्व पुढील आवश्यक प्रशासकीय, कायदेशीर व तांत्रिक कार्यवाही करण्याचे पूर्ण अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना प्रदान करण्यात येत आहेत.
७. पुढील एक आठवडयात CSR कक्षाची स्थापना करावी.

<u>विषय क्र.१६५</u>

संदर्भ – मा.गणेश बिडकर,सभागृहनेते व मा.अर्चना पाटील यांची दि.३/७/२०२६ ची सूचना.

स्वतंत्र भारताचे पहिले उद्योग व पुरवठा मंत्री डॉ.श्यामा प्रसाद मुखर्जी यांची जयंती दि.६ जुलै रोजी पूर्ण भारतभर साजरी करण्यात येत आहे. त्यानिमित्त पुणे महानगरपालिकेमध्ये त्यांचे तैलचित्र लावण्यात यावे व प्रतिवर्षी त्यांच्या तैलचित्रास पुष्पहार अर्पण करण्यात यावा.

<u>विषय क्र.१६६</u>

संदर्भ – मा.अतुल तरवडे व मा.प्राची आल्हाट यांची दि.२०/७/२०२६ ची सूचना.

प्रभाग क्र.४१ महमंदवाडी–उंड्री येथील कै.गुलाब बाबूराव घुले अग्निशामक केंद्राचे काम पूर्ण झाले असून, सदर उद्घाटन समारंभ मा.श्री.मुरलीधर आण्णा मोहोळ, केंद्रीय राज्यमंत्री, मा.नामदार योगेश टिळेकर,आमदार विधान परिषद, मा.धीरज घाटे, अध्यक्ष, पुणे शहर भारतीय जनता पार्टी तसेच पुणे शहरातील सर्व नामदार खासदार, सर्व नामदार आमदार व प्रभागातील सर्व नगरसेवक इत्यादी मान्यवरांच्या उपस्थितीत आयोजित करावा. तसेच १०० टक्के काम पूर्ण झाल्यावर करावे. प्रोटोकॉलचे पूर्ण पालन करावे.

<u>विषय क्र.१६७</u>

संदर्भ – मा.अतुल तरवडे व मा.प्राची आल्हाट यांची दि.२०/७/२०२६ ची सूचना.

प्रभाग क्र.४१ महमंदवाडी–उंड्री अंतर्गत महात्मा फुले जलतरण तलाव या सार्वजनिक सुविधेचे बांधकाम पूर्ण झाले असून, सदर उद्घाटन समारंभ मा.श्री.चंद्रकांत दादा पाटील,उच्च व तंत्रशिक्षण मंत्री,महाराष्ट्र राज्य, मा.नामदार योगेश टिळेकर,आमदार विधान परिषद, मा.धीरज घाटे, अध्यक्ष, पुणे शहर भारतीय जनता पार्टी तसेच पुणे शहरातील सर्व नामदार खासदार, सर्व नामदार आमदार व प्रभागातील सर्व नगरसेवक इत्यादी मान्यवरांच्या उपस्थितीत आयोजित करावा. तसेच १०० टक्के काम पूर्ण झाल्यावर करावे. प्रोटोकॉलचे पूर्ण पालन करावे.

(टिप :– विषय क्र. १६४ ते १६७ हे दि.३०/७/२०२६ च्या पक्षनेते सभेत फेरफारासह मान्य झाले आहेत.)

नगरसचिव कार्यालय,
पुणे महानगरपालिका, **योगिता भोसले–निकम**
शिवाजीनगर, पुणे ४११००५. **नगरसचिव,**
दिनांक :–१०/०८/२०२६. पुणे महानगरपालिका.

(टीप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस्) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)